# रस्त्यावरील वाढते अपघात चिंताजनक : नितीन गडकरी

नवी दिल्ली, दि.१० (हिंदुस्थान समाचार) : केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी यांनी रस्ते अपघातांनी होणाऱ्या म्रुत्यूंच्या प्रमाणात २०२५ सालापर्यंत ५०%घट होणे सुनिश्चित करण्यासाठी हितसंबंधितांनी सर्वसम ावेशक प्रयत्न करण्याचे आवाहन केले. आंतरराष्ट्रीय रस्ते परीसंघाच्या भारत विभागाच्या वतीने झालेल्या भारतातील रस्ते सुरक्षा आव्हाने आणि कृती आराखडा या विषयावर सुरू असलेल्या डिजिटल परिसंवाद मालिकेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

गडकरी म्हणाले की रस्त्यावरील अपघात परिस्थिती चिंताजनक असून रस्ते अपघातात जगात अमेरिका आणि चीनच्याही पुढे आपण पहिल्या क्रमांकावर आहोत. रस्त्यावरील सुरक्षिततेच्या जागृती साठी सध्या भारतभर रस्ता सुरक्षा मास पाळला जात आहे. रस्ता सुरक्षिततेच्या सर्व बाबींचा समावेश करणाऱ्या १२ डिजिटल परिसंवाद वर्षभर आयोजित करण्यात येणार आहेत,असेही ते म्हणाले. देशात दरवर्षी १.५ लाख लोक मृत्यूमुखी पडतात आणि ४.५ लाख लोक रस्ते अपघातात जखमी होतात.हे प्रमाण दरदिवशी ४१५ मृत्यू इतके आहे. या अपघातांमुळे देशाच्या राष्ट्रीय जीडीपीच्या ३.१४% सामाजिक आर्थिक नुकसान होते आणि मृत्यूमुखी पडलेल्यांपैकी ७०%लोक १८ ते ४५ या वयोगटातील असतात, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली. मंत्रालयाने केलेल्या प्रयत्नांना अधोरेखित करत गडकरी म्हणाले की, सुधारीत अभियांत्रिकी, शिक्षण, अंमलबजावणी ,आपत्कालीन सेवा या काही मंत्रालय उपाय योजना या प्रश्नांच्या मुकाबल्यासाठी घेतल्या आहेत. ते म्हणाले की मंत्रालयाने महामार्गावरील जाळ्यातील ५००० अपघातप्रवण ठिकाणे शोधून काढली आहेत आणि ४०,००० किलोमीटर पेक्षा अधिक लांबीच्या रस्त्यांचे सुरक्षिततेसाठी सर्वेक्षण केले जात आहे.

# नाशिक जिल्ह्यात सद्यस्थितीत १ हजार १०८ रुग्णांवर उपचार सुरू

नाशिक, दि.१० : जिल्हा सामान्य रुग्णालयामार्फत आज प्राप्त अहवालानुसार जिल्ह्यातील १ लाख १३ हजार ९७७ कोरोना बाधीतांना डिस्चार्ज देण्यात आला असून सद्यस्थितीत १ हजार १०८ रुग्णांवर उपचार सुरु असलेल्या रुग्णामध्ये ३६ ने घट झाली आहे. आत्तापर्यंत हजार ६३ रुग्णांचा मृत्यू झाला आहे, अशी माहिती जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या नोडल अधिकारी डॉ. अनंत पवार यांनी दिली.

उपचाररत पॉझिटिव्ह रुग्ण : नाशिक ग्रामीण म ध्ये नाशिक ४१, चांदवड १६, सिन्नर ४८, दिंडोरी २३, निफाड ८८, देवळा १५, नांदगांव ४६, येवला ४५, त्र्यंबकेश्वर २५, सुरगाणा ०६, पेठ ०२, कळवण ०४, बागलाण १७, इगतपुरी १९, मालेगांव ग्रामीण ३३ असे एकूण ४२८ पॉझिटीव्ह रुग्णांवर उपचार आहे. तसेच नाशिक महानगरपालिका क्षेत्रात ५१७, मालेगांव महानगरपालिका क्षेत्रात १५३ तर जिल्ह्याबाहेरील १० असे एकूण १ हजार १०८ रुग्णांवर उपचार सुरु आहेत. तसेच आजपर्यंत जिल्ह्यात १ लाख १७ हजार १४८ रुग्ण आढळून आले आहेत. रुग्ण बरे होण्याची टक्केवारी: जिल्हयात रुग्ण बरे होण्याची टक्केवारी नाशिक ग्रामीण मधे ९६.४० टक्के, नाशिक शहरात ९८ टक्के, मालेगाव मध्ये ९३.०८ टक्के तर जिल्हा बाह्य रुग्णांचे बरे होण्याचे प्रमाण ९४.४३ टक्के आहे.

# भारताच्या इशाऱ्यानंतर ट्वीटरने बंद केले ५०० अकाऊंटस

नवी दिल्ली, दि.१० (हिंदुस्थान समाचार) : केंद्र सरकारच्या इशाऱ्यानंतर मायक्रो-ब्लॉगिंग साइट ट्वीटरने ५०० अकाऊंट्स कायमची बंद केली आहेत. ट्विटरने याबाबत बुधवारी माहिती दिली. नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी ट्विटरने ही कारवाई केली आहे. तसेच वादग्रस्त हॅशटॅगवरही कारवाई करण्यात आली आहे. ट्विटरला भारत सरकारने ११७८ अकाऊंट्स बंद करण्यास सांगितले होते. या अकाऊंट्समागे खलिस्तान समर्थक आणि पाकिस्तानचा हात असल्याचे सरकारनं म्हटलं होतं. यासोबतच सरकारने म्हटले होते की ही अकाऊंट्स शेतकरी चळवळीच्या नावाखाली चुकीची माहिती पसरवतात आणि भडकाऊ पोस्ट करत आहेत. केंद्र सरकारच्या आदेशानंतर ट्विटरने आज एक निवेदन जारी केले की, यातील काही अकाऊंट्स त्यांना बंद केली गेली आहेत. ट्विटरने २६ जानेवारी रोजी ट्रॅक्टर परेड दरम्यान झालेल्या हिंसाचाराबद्दलही आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. ट्विटरवर असे म्हटले होते की २६ जानेवारी रोजी दिल्लीतील हिंसाचारानंतर नियमांचे उल्लंघन करणारी आणि सामाजिक सलोखा बिघडवणारा मजकूर काढून टाकण्यात आला आहे. यासह ५०० अकाऊंट्स कायमचे बंद करण्यात आले आहेत, असे ट्विटरने सांगितले आहे.

तसेच केंद्र सरकारने या हॅशटॅगशी संबंधित सर्व म जकूर हटवण्याचे आदेश ट्विटरला दिले होते. केंद्र सरकारच्या आदेशाचे पालन केले नाही तर कडक कारवाईला सामोरे जावे लागेल असा इशारा देखील केंद्र सरकारने ट्विटरला दिला होता. या संदर्भात सरकारने नोटिस बजावली होती. ३० जानेवारीला या हॅशटॅगचा वापर करणाऱ्या सर्व अकाऊंटवर ही कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र आदेशाचे पालन करण्यात न आल्याने सरकारने नाराजी व्यक्त केली. सरकारच्या आदेशाचे पालन करणे आवश्यक असून तसे न केल्यास कडक दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा केंद्र सरकारने दिला आहे.

रोज वाचा दै. 'मुंबई लक्षदीप'

# कोविडचा अधिभार जनतेवर ही केवळ अफवा – निर्मला सीतारमन



मुंबई, दि.१० : कोविडचा अधिभार जनतेवर पडतो आहे ही केवळ अफवा असल्याचे वक्तव्य केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी केले आहे. आज मुंबई भाजपातर्फे आयोजित सर्वस्पर्शी अर्थसंकल्प – अभिनंदन सभेला संबोधित करताना त्यांनी केले. अर्थमंत्री म्हणाल्या की, गेल्या वर्षात प्रथमच जागतिक साथीचा सामना करावा लागला. या महामारीला हाताळणे हे एक मोठे आव्हान होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट आदेश दिले होते की, जनतेवर कोविडचा कोणताही अधिभार नको. आत्मनिर्भर स्वस्थ भारत योजने अंतर्गत आम्ही केवळ लस विकसित केली नाही तर १०० हून अधिक देशांना लसीचा पुरवठा करीत आहोत. देशविरोधी शक्ती देशाला पुढे जाण्यापासून रोखून जनतेची नेहमी दिशाभूल करतात. मात्र, आम्ही विकासाच्या मार्गावर आहोत. देशाच्या विकासासाठी आम्हाला एस.बी.आय. सारख्या बड्या बँकांची गरज आहे.

नवीन तंत्रज्ञानाच्या माध्यमातून कर चुकवणाऱ्यांवर अंकुश ठेवला जात आहे. देशातील सर्व चार्टर्ड अकाउंटंट्सनीही बनावट फसव्या बिलांवर बारीक नजर ठेवली पाहिजे. जेणेकरून प्रत्येक करदात्याचा पैसा देशाच्या विकास कामांमध्ये उपयोगी येईल, असेही सीतारामन म्हणाल्या. मुंबई भाजपा अध्यक्ष व आ. मंगल प्रभात लोढा यांनी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे स्वागत केले. मंगल प्रभात लोढा म्हणाले की, जागतिक महामारीच्या काळातही सर्वोत्कृष्ट बजेट देशाला दिले गेले आहे. या अर्थसंकल्पात देशातील प्रत्येक घटकाची काळजी घेण्यात आली आहे.

## पेणच्या भात खरेदी केंद्रावर हजार क्विंटल भाताची खरेदी

पेण, दि.१० : पेणमधील खरेदी-विक्री संघामार्फत पेण वडखळ वरसई या ठिकाणी हमीभाव केंद्रावर शेतकऱ्यांनी विक्री केलेला सुमारे २३ हजार क्विंटल पेक्षाही जास्त प्रमाणात भात शासनाकडून खरेदी करण्यात आल्याचे खरेदी-विक्री संघाचे चेअरमन रघुनाथ तथा बापू दळवी यांनी सांगितले.

डिसेंबर महिन्यापासून पेण खरेदी-विक्री संघाने प्रथम वरसई त्यानंतर पेण शहर वडखळ या ठिकाणी भात हमी भाव आधारभूत किमतीने शासनाच्या आदेशानुसार केंद्र सुरू केले होते. अवघ्या दोन महिन्यात या हमीभाव केंद्रावर शेतकऱ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळालेला आहे आज पर्यंत या तीन केंद्रातील खरेदी केलेल्या भाताची आवक २३ हजार क्विंटल पेक्षाही जास्त प्रमाणात झाली आहे.



थोर दत्तभक्त श्री जगन्नाथ चिंतामण पाठक गुरुजी संस्थापित श्रीक्षेत्र गाणगापूर येथील जय गुरुदेव आश्रम ट्रस्टतर्फे प्रतिवर्षी २६ जानेवारी रोजी देण्यात येणारा श्री गुरुचरित्र पारायण गौरव पुरस्कार यंदा पुणेस्थित अक्षरब्रह्म सुलेखनकार श्री. सदाशिव यशवंत वाळींबे यांना त्यांनी केलेल्या गुरुचरित्र हस्तलिखित सेवेसाठी ट्रस्टचे अध्यक्ष श्री. उन्मेश म. पाटील यांच्या शुभहस्ते आश्रमाच्या वास्तुत प्रदान करण्यात आला आहे. याप्रसंगी ३० वर्षांहून अधिक काळ प्रतिपौर्णिमा गिरनारवारी करणारे बडोदास्थित थोर दत्तभक्त श्री. सातीशभाई विश्वनाथ पुणेकर तसेच श्रीक्षेत्र कडगंची येथील श्रीसायंदेव दत्तसमिती विश्वस्त श्री. विश्वनाथ शिवशरण मादगोंड आणि श्री. जमादार हेही विशेत्वाने उपस्थित होते. श्री. सदाशिव य. वाळिंबे यांनी आतापर्यंत तीन वेळा गुरुचरित्र ग्रंथाचे हस्तलिखेत केले आहे. याखेरजी ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, दासबोध, श्रीगुरुलीलामृत, शिवलीलामृत, गणेशपुराण, श्रीमद्भागवत, संत गोंदवलेकर महाराज चरित्र, इत्यादी धार्मिक ग्रंथांचे हस्तलेखनही त्यांनी गेल्या काही वर्षात केले आहे. सध्या त्यांची श्री. हरिविजय ग्रंथाची हस्तलिखित सेवा सुरू आहे.

# चांदूर रेल्वे तालुक्यातील २९ हजार शेतकऱ्यांना मिळणार नुकसान भरपाई

अमरावती, दि.१० (हिंदुस्थान समाचार) : म ागील वर्षी जून ते ऑक्टोबर महिन्यात झालेल्या अधिक पावसामुळे सोयाबीनच्या नुकसानीच्या दुसऱ्या टप्प्याचे धामणगावसह चांदूर रेल्वे व नांदगाव खंडेश्वर या तिन्ही तालुक्यातील शेतकऱ्यांच्या खात्यात ४४ कोटी ७ लाखाचे अनुदान जमा होणार असल्याची माहिती आमदार प्रताप अडसड यांनी आहे.म ागील वर्षी जून ते ऑक्टोबर म हिन्यात झालेल्या अतिवृष्टीम ुळे सोयाबीनचे नुकसान झाले होते. राज्य शासनाने दोन हेक्टरपर्यंत १० हजार रुपयांची मदत जाहीर केली होती. तालुक्यातील ३० हजार ४०० शेतकऱ्यांच्या खात्यात पहिला टप्प्यातील १२ कोटी ९८ लाख रुपये जमा करण्यात आले होते. मात्र त्यापैकी अनेक शेतकरी या सोयाबीनच्या नुकसान भरपाई पासून वंचित होते.आमदार प्रताप अडसड यांनी तिन्ही तालुक्यांतील शेतकऱ्यांना दुसऱ्या टप्प्याचे अनुदान मिळावे म्हणून राज्य शासनासोबत पत्रव्यवहार केला होता. त्या वेळी उर्वरीत शेतकऱ्यांना त्वरित अनुदान देणार असल्याचे आश्वासन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी आमदार अडसड यांना दिले होते. त्याप्रमाणे धामणगाव तालुक्यासाठी १२ कोटी ९८ लाख, चांदूर रेल्वे तालुक्यासाठी ११ कोटी ७६ लाख, नांदगाव खंडेश्वर १९ कोटी ३३ लाख रुपयांच्या रकमेचा दुसरा टप्पा प्राप्त झाला आहे. शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदानाची रक्कम त्वरित जमा करण्याचे निर्देश आमदार अडसड यांनी तिन्ही तहसीलदारांना दिले आहे.

गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात झालेल्या अतिवृष्टीच्या नुकसानीचा पहिला टप्पा तालुक्यातील शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी प्राप्त झाला. दुसऱ्या टप्प्यातील ११ कोटी ७६ लाख रुपयांचे अनुदानाचा लाभ तालुक्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मिळणार आहे. त्यामध्ये सोयाबीन, उडीद, मुंग, या जिरायती व संत्रा या बागायती पिकांचे नुकसान झालेल्या तालुक्यातील एकूण २९ हजार शेतकऱ्यांचा समावेश असल्याची माहिती तहसीलदार राजेंद्र इंगळे यांनी दिली. सुरूवातीला चांगला आलेल्या पावसाने खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना दिलासा दिला. मात्र परतीच्या वेळी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचा घात केला होता. हातातोंडाशी आलेले पीक त्यामुळे पावसाने खराब झाले.

## PUBLIC NOTICE

Take Notice that the Flat No. 1103, (1R.K.) Building No. E-2, 11th Floor, Mira Road Shivprerna Co.operative Housing Society Ltd., Shivneri Sankul, Bldg. No. E-1, E-2, E-3, New Mhada, Near Shanti Garden, Mira Road (East), Thane-401 107, adm. area 226 Sq. Feet (Carpet) beraing Survey No. 150 (Pt.), 151 (Pt.), 227 (Pt.), 228 (Pt.), 229(Pt.), 230(Pt.) of Village-Penkarpada, Taluka & District-Thane, allotted to Mr. Anandrao Sitaram More Alias Anand Sitaram More & Late Smt. Shila Anand More by Allotment Letter No. 4453/2014/23-07/2014 by Office of the Estate Manager, Konkan Housing & Area Development Board, Bandra (East), Mumbai-400 051, and the said documents registered vide Sr. No. TNN10-9328-2014 Dated 31/07/2014. Late Smt. Shila Anand More expired on 24/09/2015. My client 1) Mr. Anandrao Sitaram More Alias Anand Sitaram More, 2) Mr. Shubham Anand More are legal heir of the Late Shila Anand More, But any person having any right, title, interest, claim or demand of any nature whatsoever in respect of the said flat is hereby required to make the same known in writing along with the documentary proof thereof to the undersigned address within 14 days from the date of publication.

Sd/-
**(Prem Pandey)**
Advocate High Court,
C-54/401, Sec-10, Shanti Nagar
Mira Road, Thane - 401 107

## जाहीर नोटीस

सदर या जाहीर नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे- कोपर, डोंबिवली पश्चिम, ता. कलयाण जि. ठाणे येथील श्री मंगलमुर्ती को. ऑप.हौ.सो., मधील रूम नं.२०४ बी विंग, ४९० क्षेत्र चौ.फूट. अशी निवासी सदनिका श्री. प्रभाकर पवार व कु. सुमित प्रभाकर पवार यांनी एकत्रितपणे विकत घेतलेली होती. श्री. प्रभाकर पवार यांचे दिनांक ०६ जुलै २०२० रोजी मौजे.डोंबीवली, ता.कल्याण, जि.ठाणे येथे निधन झालेले आहे. श्री. प्रभाकर पवार यांच्या निधना नंतर कु. सुमित प्रभाकर पवार, धनश्री प्रभाकर पवार व श्रीमती.रंजना प्रभाकर पवार हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. सदर मिळकतीत कोणाही व्यक्तीचे, संस्थेचे हक्क हित संबंध असल्यास अथवा दान, गहाण, बोजा व इतर कोणत्याही अधिकाराने हक्क हित संबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत खालील दिलेल्या वकीलांच्या पत्त्यावर कागद पत्रांसहीत लेखी हरकती नोंदवाव्यात. मुदतीत हरकत न आल्यास कु. सुमित प्रभाकर पवार, धनश्री प्रभाकर पवार व श्रीमती. रंजना प्रभाकर पवार हे श्री. प्रभाकर पवार त्यांचे कायदेशीर वारस आहेत असे गृहीत धरण्यात येईल व पुढील कार्य पुर्ण केले जाईल याची सर्व संबधीतांनी नोंद घ्यावी.

पत्ता ४, श्री महालक्ष्मी दर्शन को.ऑप, हौ.सो., तेलकोस वाडी, डॉ. नेमाडे गल्ली, डोंबिवली प.४२१२०२

वकिल
अजित सुर्यकांत झनकर

## NARENDRA INVESTMENTS (DELHI) LIMITED

(CIN: L65993MH1977PLC258134)

REGD OFF: 1, MATRU CHHAYA, M. KARVE ROAD, OPP. DR. BEDEKAR HOSPITAL, NAUPADA, THANE (W)-400602

EXTRACT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND NINE MONTHS ENDED 31ST DECEMBER, 2020

| Sr. No. | Particulars | Quarter ended | | | Nine Months Ended | | Year ended |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 31.12.2020 | 30.09.2020 | 31.12.2019 | 31.12.2020 | 31.12.2019 | 31.03.2020 |
| | | Unaudited | Unaudited | Unaudited | Unaudited | Unaudited | (Audited) |
| 1 | Total Income from Operations | 596.75 | 10.12 | 9.85 | 616.93 | 26.55 | 42.96 |
| 2 | Net Profit/(Loss) from ordinary activities before tax | 27.69 | 3.64 | 2.99 | 34.73 | 9.11 | 13.01 |
| 3 | Net Profit/(Loss) from ordinary activities after tax | 20.69 | 2.73 | 2.21 | 25.96 | 7.17 | 12.78 |
| 4 | Total Comprehensive Income for the period [comprising Profit/ (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 3.67 | 0.32 | 0.75 | 7.14 | (2.72) | (7.29) |
| 5 | Paid up equity share Capital (Face value Rs 10/-) | 382.00 | 382.00 | 382.00 | 382.00 | 382.00 | 382.00 |
| 6 | Earning Per Share ( EPS ) (Not annualised) (Basic, Diluted, before and after extra ordinary items) | 0.54 | 0.07 | 0.06 | 0.68 | 0.19 | 0.33 |

Notes:

1 The above results were reviewed and recommended by the Board of Directors at their meeting held on February 10, 2021. The Statutory Auditors of the company have carried out Limited Review of aforesaid results.

2 Since the company has changed its business segment from investment activity to manufacturing and distribution of "Speciality and Fine Chemicals", the results for the quarter ended 31st December 2020 are not strictly comparable with the financials of previous period(s).. The company has formed a division "Eiko LifeSciences" for conducting the new business as a result.

3 The above is an extract of the details format of Quarter and Nine month Ended Results filed with the stock exchange under Regulation 33 of SEBI (listing Obligations and Disclosure Requirements) Regulation, 2015. The full format of the Quarter ended Financial Results are available on stock exchange website at www.bseindia.com and also on the company's website i.e. www.narendrainvestment.com

For: NARENDRA INVESTMENTS (DELHI) LIMITED
Sd/-
Laxmikant Kabra
Director
DIN:00061346

Place: Thane
Date: 10/02/2021

## WALCHANDNAGAR INDUSTRIES LTD.

Seth WALCHAND HIRACHAND



Visionary Industrialist & Our Founder

Regd. Office: 3, Walchand Terraces, Tardeo Road, Mumbai - 400 034.
CIN : L74999MH1908PLC000291
Tel No. : (022) 23612195/96/97 Fax : (022) 23634527,
E - mail : investors@walchand.com, Website: www.walchand.com

₹ in Lacs (Except for Per Share data)

**EXTRACT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED ON 31ST DECEMBER, 2020**

| Sr. No. | Particulars | Quarter Ended | | Year to date ended |
|---|---|---|---|---|
| | | 31-12-2020 | 31-12-2019 | 31-12-2020 |
| | | (Unaudited) | (Unaudited) | (Unaudited) |
| 1 | Total Income from Operations (net) | 11,035 | 7,966 | 26,176 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period (before Tax and Exceptional items) | (771) | (1,412) | (4,175) |
| 3 | Net Profit/(Loss) for the period before Tax (after Exceptional items) | (771) | (2,391) | (4,175) |
| 4 | Net Profit/(Loss) for the period after tax (after Exceptional items) | (771) | (2,391) | (4,175) |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income after tax)] | (785) | (2,421) | (4,237) |
| 6 | Equity Share Capital (Face Value of Rs 2/- each) | 761 | 761 | 761 |
| 7 | Reserves (excluding Revaluation Reserve as shown in the Balance Sheet of previous year) | - | - | - |
| 8 | Earning Per Share (of Rs 2/- each) (for continuing and discontinued operations) | | | |
| | (a) Basic : | (2.02) | (6.28) | (10.97) |
| | (b) Diluted : | (2.02) | (6.28) | (10.97) |

**Notes:**

1. Inventory includes work in progress of Rs. 2194.21 Lakhs in respect of orders which have been cancelled / put on hold. The Company is of the opinion that no provision is required to be made as on December 31, 2020 as this stock will be either liquidated or diverted to other projects.

For Walchandnagar Industries Ltd.
Sd /-
CHIRAG C. DOSHI
MANAGING DIRECTOR & CEO

Place : Mumbai
Date : February 10, 2021

A Tradition of Engineering Excellence

**Note:** The above is an extract of the detailed format of Quarter ended on 31st December, 2020 filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Financial Results of the Quarter ended is available on the Stock Exchanges website at www.bseindia.com and www.nseindia.com and on the Company's website at www.walchand.com.

## झी लर्न लिमिटेड

सीआयएन: एल८०३०१एमएच२०१०पीएलसी१९८४०५

नोंदणीकृत कार्यालय: १३५, कॉन्टीनेन्टल इमारत, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०००१८. दूर.:+९१-२२-४०३४३९००,
www.zeelearn.com | ई-मेल: investor_relations@zeelearn.com

**३१ डिसेंबर, २०२० रोजी संपलेल्या तिमाही व नऊमाहीकरिता एकमेव व एकत्रित अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षाचा अहवाल** रु. लाखात

| तपशिल | एकमेव | | | | एकत्रित | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संपलेली तिमाही | | संपलेले ९ महिने | | संपलेली तिमाही | | संपलेले ९ महिने | |
| | ३१.१२.२०२० अलेखापरिक्षित | ३१.१२.२०१९ अलेखापरिक्षित | ३१.१२.२०२० अलेखापरिक्षित | ३१.१२.२०१९ अलेखापरिक्षित | ३१.१२.२०२० अलेखापरिक्षित | ३१.१२.२०१९ अलेखापरिक्षित | ३१.१२.२०२० अलेखापरिक्षित | ३१.१२.२०१९ अलेखापरिक्षित |
| एकूण उत्पन्न | २२१४.१८ | ४१५०.८७ | ९०८८.६२ | १६०३५.७५ | ६९१२.११ | १२६३१.६१ | २५१४२.३९ | ४४१००.५६ |
| करपुर्व निव्वळ नफा | ४६.६२ | १६७६.२८ | १७२९.९० | ७०३८.८६ | ३७.५६ | २२३५.०७ | १३२४.२३ | ९१७२.१४ |
| करानंतर निव्वळ नफा | ३१.४५ | १२६७.६४ | १२९७.८७ | ५२२३.६० | २१.४८ | १६३१.७२ | ५८१.४७ | ६७३३.७१ |
| इतर सर्वंकष उत्पन्न/(तोटा) कर प्रभावासह | ०.८० | (६.३५) | २.४१ | (१९.०५) | १४.४७ | (६.४८) | ३८.८५ | (२५.८७) |
| कालावधीकरिता एकूण सर्वंकष उत्पन्न | ३२.२५ | १२६१.२९ | १३००.२८ | ५२०४.५५ | ३५.९५ | १६२५.२४ | ६२०.३२ | ६७०७.८४ |
| भरणा केलेले समभाग भांडवल (दर्शनी मुल्य रु.१/- प्रती) | ३२६०.९३ | ३२६०.९३ | ३२६०.९३ | ३२६०.९३ | ३२६०.९३ | ३२६०.९३ | ३२६०.९३ | ३२६०.९३ |
| इतर समभाग (अंतरिम कालावधीकरिता वार्षिकीकरण नाही) | | | | | | | | |
| मूळ (रु.) | ०.०१ | ०.३९ | ०.४० | १.६० | (०.०१) | ०.४५ | ०.१९ | १.८९ |
| सौमिकृत (रु.) | ०.०१ | ०.३९ | ०.४० | १.६० | (०.०१) | ०.४५ | ०.१९ | १.८९ |

**टीप:**

१) वरील निष्कर्षाचे लेखासमितीद्वारे पुनर्विलोकन करण्यात आले आणि ९ फेब्रुवारी, २०२१ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत मान्य करून नोंदपटावर घेण्यात आले.

२) सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन २०१५ च्या नियम ३३ अन्वये स्टॉक एक्सचेंजसह सादर करण्यात आलेली कंपनीचे अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचे सविस्तर नमुन्यातील उतारा आहे. अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षाचे संपूर्ण नमुना स्टॉक एक्सचेंजच्या **www.bseindia.com** व **www.nseindia.com** आणि कंपनीच्या **www.zeelearn.com** वेबसाईटवर उपलब्ध आहे.

संचालक मंडळाच्या वतीने व करिता
सही/-
विकाश कुमार कर
सीईओ व पुर्णवेळ संचालक
डीआयएन:०७४१८७८७

दिनांक : ०९ फेब्रुवारी, २०२१
ठिकाण : मुंबई